# नांदेड जिल्ह्यातील दोन वॉंटेड छत्रपती संभाजीनगर गुन्हे शाखेकडून जेरबंद

## ▶ महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणात घातला होता धुमाकूळ
## ▶ नांदेड पोलिसांनी ठेवले होते २५ हजारांचे बक्षीस

**छत्रपती संभाजीनगर/ नांदेड : नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयाने २५ हजार रुपये बक्षीस ठेवलेले व बिदर कर्नाटक पोलिसांच्या अंगावर गाडी घालून पळून जाणारे जिल्ह्यातील दोन कुख्यात आरोपींना दोन अग्निशस्त्र, जिवंत काडतुसांसह संभाजीनगर गुन्हे शाखेकडून जेरबंद करण्यात आले. ही कारवाई १० ऑक्टोबर रोजी करण्यात आली.**

गुप्त माहितीआधारे नांदेड जिल्ह्यातील गुन्ह्यात फरार असलेले कुख्यात आरोपींना पोलीस अधीक्षकांनी २५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केलेले आरोपी रबज्योतसिंग उर्फ गब्बा तिवाना (२३, रा. बाबा निदानसिंग कॉलनी, भगतसिंग रोड, नांदेड) अमित गोडबोले (२३, रा राज कॉर्नर सहयोगनगर, नांदेड) यांना हॉटेल गणेश एक्सक्युटिव्ह एन-२ सिडको (छत्रपती संभाजीनगर) येथून ताब्यात घेतले. त्यांच्याजवळून दोन अग्निशस्त्र (पिस्टल), दोन जिवंत काडतुसे, ३ मोबाइल फोन, जावींचा (धारदार शस्त्र), एक कार असा एकूण २२ लाख ९८ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी रबज्योतसिंग ऊर्फ गया तिवाना यांचे विरुद्ध नांदेड जिल्ह्यात विविध पोलीस ठाण्यात व कर्नाटकातील बिदर येथे गंभीर स्वरुपाचे आठ गुन्हे दाखल आहेत. तसेच आरोपी अमित गोडबोल याचे विरुद्ध नांदेड जिल्ह्यात विविध पोलीस ठाण्यात व कर्नाटकातील बिदर येथे गंभीर स्वरुपाचे (३) गुन्हे दाखल आहेत.छत्रपती संभाजीनगर पोलीस आयुक्त मनोज लोहिया, पोलीस उपायुक्त अपर्णा गीते, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे धनजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गुन्हे संदीप गुरमे, पोलीस उप निरीक्षक विशाल बोडखे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक सतीश जाधव, पो. अं. संदीप तायडे, संजयसिंह राजपुत, संदीप राशीनकर राहुल खरात, तात्याराव शिनगारे यांनी केली आहे.



आरोपी रबज्योत सिंग



आरोपी अमित गोडबोले



जप्त करण्यात आलेले पिस्टल व काडतुसे.

### नांदेडसह बिदर जिल्ह्यात गुन्हे दाखल

अमित शेषराव गोडबोले याच्याविरुद्ध नांदेड जिल्ह्यात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात ४४०/२३ कलम ३०७,१४३,१४४,४७,१४८,१४९ भादंवि सहकलम ४.२५ भा.ह.का, मुखेड पोलीस ठाण्यात २२४/२२ कलम ३९५ भादंवि, टाऊन बिदर (बिदर) ५९/२३ कलम ३९५ भादंविनुसार गुन्हे दाखल आहेत.

### गँगस्टर रबज्योतवर नांदेडमध्ये खंडणीचे गुन्हे

यातील आरोपी रबज्योतसिंग तिवाना,यांची नांदेड जिल्ह्यात दहशत असून तो साथीदारासह क्लब चालकांकडून खंडणी वसूल करीत होता. त्यानंतर त्याने स्वतःची गँग बनविली होती. गँगच्या मदतीने त्याने जिल्ह्यात बरेच गुन्हे करीत असल्याची माहिती समोर आली आहे. नांदेड येथील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत घातलेल्या दरोड्यात ३० लाख रुपये, मुखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दरोड्यात १७ लाख रुपये, विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दरोड्यात २५ लाख रुपयांचा ऐवज पळविला होता. त्याच्यावर नांदेडमध्ये विविध कलमान्वये सहा गुन्हे दाखल आहेत. तर त्याचा साथीदार अमित गोडबोले याने काही दिवसांपूर्वी कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील टाऊन पोलीस ठाण्याच्या अंमलदारावर जीवघेणा हल्ला करुन अंगावर चारचाकी वाहन घालून पळून पळून गेला होता. हे आरोपी नांदेड जिल्ह्यात गुन्हे करुन शेजारच्या तेलंगणा व कर्नाटकात पळून जाऊन वास्तव्य करीत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

पुण्यनगरी
दि. 12.10.2023